**सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय**

**नविन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे-४११००१**

दूरध्वनी क्र.: २६१२२८४६/४७ Email - commcoop२०११@gmail.com

41

जा.क्र. ८ सआ/वैधा.कार्य.व अव.का/रा.स.स/ ९५३ /२०१८ दि.५ जुलै.२०१८

प्रति,

विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था.(सर्व)

विषय:- १० वर्षावर अवसायनात असणा-या संस्थांची नोंदणी कालबध्द कृती कार्यक्रमा नुसार रद्द करणेबाबत.

संदर्भ:- दि.२१/०६/२०१८ रोजी १० वर्षावरील अवसायनात असणा-या सहकारी संस्थांच्या अवसायकांच्या बैठकीत अवसायकांना देण्यात आलेल्या सुचना -

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भांकीत बैठकीत अवसायकांना देण्यात आलेल्या सुचने नुसार १० वर्षावरील अवसायनात असणा-या सहकारी संस्थांची नोंदणी संबंधीत संस्थांच्या निबंधकांनी रद्द करावयाची असून त्यासाठी मा.सहकार आयुक्त कार्यालयाने आखून दिलेल्या कालबध्द कृती कार्यक्रमाची व सुचनांची अमंलबजावणी अवसायक व निबंधक यांनी करावयाची आहे.

**१) मालमत्ता व देणी नसणा-या व मालमत्ता नसणा-या पण देणी असणा-या १० वर्षावरील सहकारी संस्थांची नोंदणी रद्द करण्यासाठी अवसायक व निबंधक यांनी खालील कालबध्द कृती कार्यक्रमाची अमंलबजावणी करावी :-**

| अ.क्र | अवसायनातील सहकारी संस्थेचा मत्ता व दायीत्वा नुसार प्रकार | कालबध्द कृती कार्यक्रम | |
|---|---|---|---|
| | | अवसायक व निबंधकाने करावयाची कृती | विहित दिनांक |
| १ | १) मालमत्ता व देणी नसणा-या संस्था<br>२) मालमत्ता नसणा-या पण देणी असणा-या संस्था | १) अवसायकाने अवसायनातील संस्थेचे कलम १०८ अन्वये दि.३०/६/२०१८ रोजीचे लेखापरिक्षण करण्यासाठीचा प्रस्ताव संबंधीत निबंधकाकडे सादर करणे | दि.१०/०७/२०१८ रोजी |
| | | २) निबंधकाने लेखापरिक्षकाची नियुक्ती करणे | दि.१३/०७/२०१८ |
| | | ३) लेखापरिक्षकाने लेखापरिक्षण पूर्ण करणे | दि.१/०८/२०१८ पर्यंत |
| | | ४) अवसायकाने नोंदणी रद्दकरण्याचा अंतिम अहवाल निबंधकास सादर करणे. | दि.१/०९/२०१८ पर्यंत |

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| | | ५)अवसायकाने सर्वसाधारण सभा बोलविणेचा अंतीम दिनांक | दि.१६/०९/२०१८ पर्यंत |
| | | ६) निबंधकाने सदर संस्थेची नोंदणी रद्द करण्याचे आदेश पारित करणे | दि.३०/०९/२०१८ पूर्वी |
| | | ७) निबंधकाने नोंदणी रद्द आदेश मा.सहकार आयुक्त कार्यालयास सादर करणे. | दि.३०/०९/२०१८ पर्यंत |

वर नमुद केले प्रमाणे विहित मुदतीत अमंलबजावणी अवसायक व निबंधकांनी न केल्यास याची गंभीर दखल घेऊन व्याक्तीश: जबाबदारी निश्चित करणेत येईल.

**२) मालमत्ता व देयता असणा-या व मालमत्ता आसणा-या पण देयता नसणा-या १० वर्षा वरील अवसायनात असणा-या सहकारी संस्थाची नोंदणी रद्द करण्यासाठी अवसायक व निबंधक यांनी खालील कालबध्द कृती कार्यक्रमाची अमंलबजावणी करावी :-**

| अ.क्र | अवसायनातील सहकारी संस्थेचा मत्ता व दायीत्वा नुसार प्रकार | कालबध्द कृती कार्यक्रम | |
|---|---|---|---|
| | | **अवसायक,कस्टोडियन/रिसिव्हर व निबंधकाने करावयाची कृती** | **विहित दिनांक** |
| १ | १) मालमत्ता व देयता दोंन्ही असणा-या संस्था.<br>२) मालमत्ता असणा-या पण देणी नसणा-या संस्था. | १) अवसायकाने अवसायनातील संस्थेचे कलम १०८ अन्वये दि.३०/६/२०१८ रोजीचे लेखापरिक्षण करण्यासाठीचा प्रस्ताव संबंधीत निबंधकाकडे सादर करणे | दि.१०/०७/२०१८ रोजी |
| | | २) निबंधकाने लेखापरिक्षकाची नियुक्ती करणे | दि.१३/०७/२०१८ |
| | | ३) लेखापरिक्षकाने लेखापरिक्षण पूर्ण करणे | दि.१/०८/२०१८ पर्यत |
| | | ४) मालमत्ता व दावा योग्य हक्क याचा तपशिल/यादी लेखापरिक्षक/अवसायक यांचे संयुक्त स्वाक्षरीने प्रमाणित करुननिबंधकास सादर करणे. | दि.१/०९/२०१८ |
| | | ५) अवसायकाने नोंदणी रद्दकरण्याचा अंतिम अहवाल निबंधकास सादर करणे. | दि.१६/०९/२०१८ पर्यत |
| | | ६) अवसायकाने सर्वसाधारण सभा बोलवणेचा अंतीम दिनांक | दि.३०/०९/२०१८ |



Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| | | ७)मालमत्ता व दावायोग्य हक्क निबंधकाने असाईन करुन घेणे,मालमत्ता पत्रकामध्ये मालमत्ता हक्क निबंधकांच्या नावे करणे निबंधकाने सदर संस्थेची नोंदणी रद्द करण्याचे आदेश पारित करणे व निबंधकाने रिसिव्हर/कस्टोडियनची नेमणूक करणे | दि.१५/१०/२०१८ |
| | | ८) रिसिव्हर/कस्टोडियनने मालमत्तेचे मुल्यांकन करणे | दि.३१/१०/२०१८ पर्यंत |
| | | ९) Upset Price Fixation साठी प्रस्ताव निबंधकाकडे पाठवूण निबंधकाने त्यास मंजूरी देणे. | दि. १०/११/२०१८ |
| | | १०) E - Auction व्दारे रिसिव्हर/कस्टोडियन ने मालमत्ता विक्री करणे व त्यास निबंधकाची मान्यता देणे. | दि.१०/२/२०१९ पर्यंत |
| | | ११) दावा योग्य हक्कांबाबत अंतिम कार्यवाही करून निर्णय घेणे. | दि. १०/०३/२०१९ |
| | | १२) मालमत्ता व दावा योग्य हक्का बाबत केलेल्या कार्यवाहीचा अंतिम अहवाल निबंधकाने विभागीय सहनिबंधक यांना सादर करणे. | दि. ३१/३/२०१९ पर्यंत |

**तसेच वरिल कालबध्द कृती कार्यक्रमाची अमंजबजावणी करताना खालील सर्वसाधारण सुचनांचे पालन अवसायक व निबंधक यांनी करावे :-**

१) १० वर्षावरील अवसायनात असणा-या संस्थांची मलमत्ता व दावायोग्य हक्क या बाबतची नोंदणी रद्द झाले नंतरची पुढील कार्यवाही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम ८९ (१७) अन्वये संबंधीत संस्थंच्या निबंधकाने करावी .

२) अवसायकाने संबंधीत १० वर्षा वरील अवसायनातील संस्थेचे दिनांक ३० जून,२०१८ रोजीचे ताळेबंद पत्रक त्वरित तयार करून त्याचे मालमत्ता व दावायोग्य हक्क ,देणीचा तपशिल लेखापरिक्षक व अवसायक यांचे संयुक्त स्वाक्षरीने प्रमाणीत करावा.



Scanned by CamScanner

३) अवसायकाने सदर १० वर्षा वरील अवसायनातील संस्थेचे न्यायालयीन प्रकरण सुरू असल्यास मा.न्यायालयास सदर संस्थेचा अवसायन कालावधी अधिनियमातील तरतुदीनुसार समाप्त झालेला असल्याने त्याला अवसायक म्हणून संस्थेचे कामकाज पहाता येणार नसल्याने व नोंदणी रद्द करणे आवश्यक असल्याचे सिव्हिल अप्लीकेशन अर्ज दाखल करावा. तसेच नोंदणी रद्द झाले नंतरची कार्यवाही करणेबाबत नियम ८९(१७) मधील तरतुद मा.उच्च न्यायालय यांचे निर्दशनास आणून दयावी. याबाबत मा.उच्च न्यायालय यांचे आदेश/निदेश प्राप्त करून कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी. मा.उच्च न्यायालय यांचे आदेश/निदेश मुख्यालयास तात्काळ सादर करावे.

४) मालमत्ता व देणी दोन्ही नसणा-या १० वर्षा वरील अवसायनातील संस्थाबाबत नोंदणी रद्द करण्याची कार्यवाही त्वरित पार पाडावी .

५) १० वर्षा वरील अवसायनात असणा-या संस्थेचे अवसायकांची शक्यतो त्याच संस्थेवर नंतरची कार्यवाही करण्यासाठी कस्टोडियन/रिसिव्हर म्हणून निबंधकाने नेमणूक करावी.

६) संस्थेचे कार्यक्षेत्र काहीही असले तरी वरील कृती कार्यक्रमाची अमंलबजावणी करवून घेण्याची जबाबदारी विभागीय सह निबंधक यांची राहील. या बाबत त्यांनी अवसायक व निबंधक यांना उचीत मार्गदर्शन करावे.तसेच वरील कृती कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचा प्रगती अहवाल विभागीय सह निबंधक यांनी दरमहा सहकार आयुक्त कार्यालयास सादर करावा.

७) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधिल तरतूदी ,या कार्यालयाने निर्गमित केलेली अवसायना संबंधिची परिपत्रके, मा.उच्च न्यायालयाचे आदेश यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करून दिनांक ३१/०३/२०१९ पर्यत उपरोक्त कालब्ध कार्यक्रम व सुचनांची अमलबजावणी अवसायक व निबंधक यांनी करावी. अन्यथा सदर बाबतीत कोणत्याही प्रकारची हयगय झाल्यास व त्यामुळे सदर संस्थांची नोंदणी रद्द न केल्यास संबंधीत अवसायक /निबंधक यांचे विरूध्द महाराष्ट्र नागरी सेवा नियमार्तंगत शिस्त भंगाची कार्यवाही प्रस्तावीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

( डॉ. आनंद जोगदंड)
अपर आयुक्त व विशेष निबंधक
सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य पुणे.



Scanned by CamScanner